महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतीक्षा रवींद्र घोडविंदे

गुरुवार ■ 06 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 222 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## सुरेश धस म्हणजे आधुनिक भगीरथ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मराठवाड्याचा दुष्काळ आता भूतकाळ होणार

"मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी गोपीनाथ मुंडे आणि मराठवाड्यातील अनेक नेत्यांनी केला. पण दुर्दैवाने ते सगळे काम पूर्ण झाले नाही. 23 टीएमसी पाण्यापैकी केवळ 7 टीएमसी पाणी सापडले. या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे. जो पर्यंत पश्चिमी वाहिन्यांचे पाणी, थेट समुद्रात जाणारे पाणी गोदावरीमध्ये आणीत नाहीत तोपर्यंत मराठवाडा दुष्काळ मुक्त होणार नाही. त्यासाठी गोदावरीच्या एकात्मिक आराखडा बनवला आहे. त्या माध्यमातून 53 टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आले पाहिजे. या संदर्भात 2019 साली आपण जीआर काढला. मात्र नंतर सरकार गेल्याने यावर कारवाई झाली नाही असं फडणवीस या वेळी म्हणाले.



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यातली ही घटना घडून दोन महिने पूर्ण होण्यास आले आहेत. दरम्यान भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी हा प्रश्न लावून धरला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं होतं. तसंच दोनदा या सगळ्या प्रकरणात अजित पवारांची भेट घेतली होती. दरम्यान बीडच्या आष्टीमध्ये देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. देवेंद्र फडणवीस यांनी सुरेश धस यांचा विशेष उल्लेख केला. सुरेश धस यांना त्यांनी आधुनिक भगीरथाची उपमा दिली. तसंच एकदा सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात असंही मुख्यमंत्री म्हणाले. देवेंद्र फडणवीस सुरेश धस यांच्याबाबत म्हणाले, "सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असून ते एकदा मागे लागले तर डोकं खाऊन टाकतात." असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. "महायुतीचं सरकार असताना त्यांनी मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मेहनत घेतली" असं सांगत फडणवीसांनी सुरेश धस यांचे कौतुक केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आष्टी येथील कुंटेफळ साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यात आलं. त्या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते.

### "मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी

"मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी गोपीनाथ मुंडे आणि मराठवाड्यातील अनेक नेत्यांनी केला. पण दुर्दैवाने ते सगळे काम पूर्ण झाले नाही. २३ टीएमसी पाण्यापैकी केवळ सात टीएमसी पाणी सापडले. या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे. जो पर्यंत पश्चिमी वाहिन्यांचे पाणी, थेट समुद्रात जाणारे पाणी गोदावरीमध्ये आणीत नाहीत तोपर्यंत मराठवाडा दुष्काळ मुक्त होणार नाही. त्यासाठी गोदावरीच्या एकात्मिक आराखडा बनवला आहे. त्या माध्यमातून ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आले पाहिजे." "मी माझे भाग्य समजतो पुन्हा माझ्यावर जलसिंचनची जबाबदारी आली. या प्रकल्पाचे सगळे अडथळे दूर केले. असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसंच सुरेश धस यांचा उल्लेख आधुनिक भगीरथ असा केला.

## वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीच्या प्रतीक्षेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आरोग्य विभागामध्ये 'गट ब' या पदावर कार्यरत असलेल्या जवळपास ७५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना सरकारकडून गेल्या अनेक वर्षांपासून पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. यातील अनेक अधिकाऱ्यांची सेवा २४ वर्ष तर काही अधिकाऱ्यांची तीन वर्षांची सेवा पूर्ण झाली आहे. पदोन्नती मिळत नसल्याने त्यांचे मानसिक व आर्थिक नुकसान होत असून, ते प्रचंड तणावाखाली वावरत आहेत.

आरोग्य विभागामध्ये आरोग्य केंद्रापासून जिल्हा रुग्णालयांमध्ये 'गट ब' संवर्गातील अधिकारी कार्यरत आहेत. राज्यात आरोग्य विभागातील विविध कार्यालयांमध्ये जवळपास ७५० वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. सरकारी नियमानुसार नियुक्तीनंतर तीन वर्षांनी पदोन्नती मिळणे गरजेचे असते. मात्र 'गट ब' संवर्गामध्ये कार्यरत असलेल्या जवळपास ७५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती झाल्यापासून एकदाही पदोन्नती मिळाली नाही. यातील अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांची २४ वर्षांची सेवा पूर्ण झाली आहे. तर अनेक वैद्यकीय अधिकारी हे कोणतीही पदोन्नती न घेता निवृत्त झाले आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांना



**जानेवारी २४ मध्ये गट अ संवर्गात २८३ पदांसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची सरळसेवा पदभरती जाहीर करण्यात आली. यामुळे अनेक वर्ष सेवा करून न्याय मिळत नसल्याने 'गट ब' अधिकारी यांच्यामध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी महासंघाचे राज्याध्यक्ष डॉ. अरुण कोळी यांनी दिली.**

मानसिक तणावालाही सामोरे जावे लागत आहे.

'गट ब' संवर्गातील बीएएमएस असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती न दिल्याने त्यांच्यासाठी असलेला पदोन्नतीचा कोटा अनेक वर्षांपासून तसाच आहे. कोटानिहाय उपलब्ध असलेल्या जागेनुसार सध्या जवळपास २५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'गट अ' संवर्गात पदोन्नती मिळू शकते. मात्र वेळेवर पदोन्नतीची प्रक्रिया न केल्याने अनेक अधिकारी पदोन्नतीशिवायच निवृत्त झाले. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून 'गट ब' संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी, यासाठी महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी महासंघ प्रयत्नशील आहे. सर्व उपसंचालक कार्यालयामार्फत 'गट ब' संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भात आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव जून २०२३ पूर्वी संचालक कार्यालयाला पाठविण्यात आला आहे. तसेच पदोन्नतीचे परिपूर्ण प्रस्ताव तत्काळ व कालमर्यादेत सादर करण्याबाबत आरोग्य विभागाच्या सचिवांना १३ स्मरणपत्र पाठवण्यात आले आहेत. तरी देखील गट ब वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीकडे सरकारकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे.

## शहापूरकरांना भावली धरणाच्या पाण्याची प्रतिक्षा

## जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : भावली योजना रखडल्याने शहापूरच्या ९७ गावांची टँकरमूक्तीही रखडली

शहापूर (भरत उबाळे) : डिसेंबर २०२४ पर्यंत पुर्णत्वास येईल, असे सांगण्यात आलेली इगतपूरीच्या भावली धरणावरील पाणीयोजना प्रत्यक्षात २०२५ या वर्षातील जानेवारी महिना सरुनही रखडली असल्याने परिणामी पाणीटंचाईग्रस्त शहापूर तालुक्यातील ९७ गावांची टँकरमुक्ती देखील रखडली आहे. त्यामुळे याहीवर्षी तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना टँकरने करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरच अवलंबून रहावे लागत आहे.

तर भावली धरणाचे १३ दलघमी. पाणी शहापूरला देऊ नये. ते मराठवाड्याला देण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे याचिका दाखल करण्यात आली असून या याचिकेवर सुनावणी सुरु आहे. त्यामुळे ही योजना रखडल्यानंतर आता जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात तालुक्यातील पाणीटंचाईच्या हंगामाचा सामना या योजनेशिवायच गावे आणि वाड्यावस्त्यांना करावा लागण्याची येथे स्थिती आहे.

केवळ शहापूर तालुक्यातील वर्षानुवर्षे पाणीटंचाईत होरपळणाऱ्या गावे, आदिवासी वस्त्यांची टंचाई दूर व्हावी, टँकरमूक्ती मिळावी आणि दरवर्षी फक्त टँकरने पाणीपुरवठ्यावर प्रतिवर्षी अडीच कोटी रुपये या प्रमाणे होणारा करोडो रुपयांचा खर्च नियंत्रणात यावा, याकरिता भावली योजना आकारास आणण्यात आली.

परंतु ही योजना अद्यापही पाणी देत नसल्याने पाणीटंचाईच्या समस्येवर मात झालेली नाही. त्यामुळे २०२४ या मागीलवर्षी जानेवारी ते जून अखेर पर्यंत २ कोटी ५ लाख रुपये खर्च झाले होते. तर यावर्षीच्या टंचाई हंगामासाठी सव्वा दोन कोटी रुपये निव्वळ टँकरच्या पाणीपुरवठ्यावर अपेक्षित धरण्यात आले आहेत. भावली योजनेसाठी ३१६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी १८१ कोटी रुपये अद्यापपर्यंत या योजनेवर खर्च झाले आहेत. तर अवघे ६५ टक्के काम या योजनेचे पूर्ण झाले आहे. ही योजना निर्धारित कालावधीत पूर्ण न झाल्याने रखडली आहे. तर या योजनेच्या निमित्ताने शहापूर तालुक्याला दाखविण्यात आलेले टँकरमूक्तीचे स्वप्न देखील रखडले आहे.






> भावली योजनेच्या जलवाहिनीसाठी काही प्रमाणात भूसंपादनाचा प्रश्न शिल्लक आहे. काही ठिकाणी वनजमीनींचा प्रश्न आहे. भूसंपादन करणे राहिले असल्याने या योजनेला विलंब होत आहे. तसेच जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे दाखल याचिकेवर जीवन प्राधिकरणाने प्रतिज्ञापत्र दिले आहे. याबाबत येत्या १३ फेब्रुवारीला पुन्हा सुनावणी आहे. सुरुवातीला जलशुद्धीकरणाशिवाय पाणीपुरवठा करता येईल. शुद्ध पाणीपुरवठा इतक्यात करता येणार नाही. येत्या ४ महिन्यात ही योजना सुरु होईल.
>
> केतन चौधरी, उपअभियंता, जीवन प्राधिकरण, शहापूर.

> भावलीच्या पाणी प्रश्नाबाबत मी याचिका दाखल केली आहे. मराठवाड्याला मिळणारे पाणी हे शहापूरला वळविले जात आहे. हे पाणी मराठवाड्याच्या हक्काचे आहे.
>
> - शंकरराव नागरे, अध्यक्ष, मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठान

> शहापूरला पिण्यासाठी हे पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी शासनाला पत्रव्यवहार केला होता. मात्र शासनाने हे पाणी देण्याचा निर्णय घेतला असून योजनेचे काम सुरु आहे.
>
> संतोष तिरमनवार, कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे महामंडळ

## बदलापूर शहरातील खासगी रुग्णालये चौकशीच्या फेऱ्यात

### ठाणे सिव्हिल सर्जनच्या पथकाकडून खासगी रुग्णालयांची तपासणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर: शहरातील सर्व खासगी रुग्णालये आता चौकशीच्या फेऱ्यात येणार आहेत. नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे पाळत या रुग्णालयातील कामकाज सुरू आहे का? यासंदर्भात आता ठाणे सिव्हिल सर्जनच्या पथकाकडून शहरातील सगळ्या खासगी रुग्णालयांची तपासणी होणार आहे. इथल्या एका खासगी रुग्णालयात प्रवीण समजिस्कर या तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर खासगी रुग्णालयातील रुग्णसेवेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

नोव्हेंबर २०२४ मध्ये शहरातील एका ३४ वर्षीय प्रवीण समजिस्कर या युवकाचा अपघात झाला होता. या वेळी त्याच्या जबड्याला जी दुखापत झाली होती, त्यासाठी एक छोटे ऑपरेशन करण्यात येणार होते. या वेळी कुटुंबाने उपचारासाठी दाखल केलेल्या येथील एका खासगी रुग्णालयात ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन होण्यापूर्वीच प्रवीणचा मृत्यू झाला. याप्रकरणी मनसेच्या महिला शहराध्यक्षा संगीता चेंदवणकर आणि सामाजिक कार्यकर्ते अविनाश सोनवणे यांनी आरोग्य विभागाकडे तक्रार केली होती. त्यानंतर आरोग्य विभागाने संबंधित रुग्णालयातील या घटनेची व इतर वेळी रुग्ण सेवा पुरवत असताना, काय त्रुटी जाणवत आहेत, यासाठी हॉस्पिटल संदर्भात द्विसदस्य चौकशी समिती स्थापन करून चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बदलापुरात आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक डिग्री असणाऱ्या डॉक्टरांना ॲलोपॅथी रुग्णालय उघडण्याची परवानगी कशी दिली गेली? यासंदर्भाची तक्रार आरोग्य विभागाकडे केली होती. या अनुषंगाने आता बदलापुरातील सर्व रुग्णालयांची तपासणी केली जाणार आहे.

## खडवली येथे अमानुष वृक्षतोड – पर्यावरणाला धोका



३० - ३५ वर्षे जुनी झाडे तोडली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

.टिटवाळा : कल्याण तालुक्यातील खडवली येथे मोठ्या प्रमाणावर परवानगीशिवाय वृक्षतोड झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. स्थानिक प्रशासनाच्या परवानगीशिवाय सुमारे २०० ते २५० झाडांची निर्घृण कत्तल करण्यात आली असून, त्यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीतीव्यक्त केली जात आहे. तर वनपरिमंडळ यांच्या कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या ठिकाणी ही वृक्षतोड होवूनही कोणतीच कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

ही वृक्षतोड **सर्वे नंबर ३३/१/ब (क्षेत्र ०.९३.००) आणि सर्वे नंबर ३३/३/ड (क्षेत्र ०.८८.१०) या जमिनीवर झाली असल्याची माहिती मिळत आहे. कायद्याने कोणत्याही वनजमिनीवरील झाडांची तोड करण्यासाठी वनविभागाची परवानगी आवश्यक असते, मात्र या नियमाचा सर्रास भंग करण्यात आला आहे. तर या सगळ्या प्रकारात मोठा आर्थिक व्यवहार सबंधित झाडे तोडणारी व्यक्ती आणि वन विभाग अधिकारी यांच्यात झाला असल्याची देखील चर्चा आहे. या घटनेला 15 दिवस उलटूनही वनअधिकारी याबाबत अनभिज्ञ असल्याने या आर्थिक साटेलोटे झाल्याचा दाट संशय व्यक्त केला जात आहे.

खडवली वनपरिमंडळाचे अधिकारी ए. आर. जाधव यांनी वृक्षतोडीबाबत तक्रारी आल्याची पुष्टी केली असून, संबंधित जमिनीची पाहणी, नुकसानाचे प्रमाण आणि जबाबदार व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याचे मोघम उत्तर दिले आहे. वनविभागाच्या कायद्यानुसार अनधिकृत वृक्षतोड ही गंभीर गुन्हा मानला जातो . दोषींवर दंड, जमीन जप्ती आणि शिक्षा यासारखी कठोर कारवाई केली जाऊ शकते. या अमानुष वृक्षतोडीमुळे स्थानिक पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. मोठ्या संख्येने झाडे तोडल्यामुळे भविष्यात याचा परिणाम हवामानावर आणि स्थानिक जलस्रोतांवरही होऊ शकतो. पर्यावरणप्रेमींनी या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असला तरी, भविष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. पर्यावरणसंवर्धनासाठी स्थानिक प्रशासनाने वनसंरक्षण कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पर्यावरण हा आपला सामूहिक वारसा आहे, त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाचीच आहे. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर भविष्यात अधिक गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.एक झाड तोडत असताना त्याजागी 5 झाडे लावण्याचा नियम आहे . तसेच कोणतेही झाड हे विनापरवानगी तोडता येत नाही . ज्या हिरव्यागार झाडांच्या सावलीत कधीकाळी इथलीच माणसे स्थिरावली असतील त्याच जिवंत झाडांवर कुऱ्हाड चालवणे म्हणजेच अमानुषता आहे . असे कृत्य करणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद कायद्याने करायला हवी असे मत पर्यावरणप्रेमी आणि पर्यावरणमित्र गोविंद प्रजापती यांनी व्यक्त केले. तसेच या घटनेची आपण गंभीर दखल घेतली असून याची सखोल चौकशीची मागणी आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले .

# गीतासार



हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं
जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय
कृतनिश्चयः ॥२- ३७॥

युद्धात तू मारला गेलास तर स्वर्गाला जाशील अथवा युद्धात जिंकलास तर पृथ्वीचे राज्य भोगशील. म्हणून हे कुंतीपुत्र अर्जुना, तू युद्धाचा निश्चय करून उभा राहा. ॥ २-३७ ॥

सुखदुःखे समे कृत्वा
लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं
पापमवाप्स्यसि ॥२- ३८॥

जय-पराजय, फायदा-तोटा आणि सुख-दुःख समान मानून युद्धाला तयार हो. अशा रीतीने युद्ध केलेस तर तुला पाप लागणार नाही. ॥ २-३८ ॥

एषा तेऽभिहिता सांख्ये
बुद्धिर्योगे त्विमां श‍ृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ
कर्मबन्धं प्रहास्यसि
॥२- ३९॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), हा विचार तुला ज्ञानयोगाच्या संदर्भात सांगितला. आणि आता कर्मयोगाविषयी ऐक, ज्या बुद्धीने युक्त झाला असता कर्माचे बंधन चांगल्या प्रकारे तोडून टाकशील. ॥ २-३९ ॥

## रेसिपी

### हेल्दी राजमा-मटार टिक्की



**साहित्य**

- उकडलेला राजमा - 2 वाटी
- उकडलेले मटार - 2 वाटी
- चिरलेला गाजर - 2 वाटी
- उकडलेला बटाटा - 1 ते 2
- आल्याचा तुकडा
- कांदा - 1
- हिरव्या मिरच्या - 2
- भाजलेले बेसन - 2 चमचे
- चाट मसाला
- गरम मसाला
- काळी मिरीपूड
- तेल
- कोथिंबीर
- मीठ

**कृती**

गाजर आणि उकडलेले बटाटे किसून घ्यावेत.
एका बाऊलमध्ये राजमा, मटार एकत्र करुन घ्यावे.
यानंतर त्यात कांदा, बटाटा, गाजर, बेसन घालावे आणि एकजीव करुन घ्यावे.
सर्व मसाले, बारीक चिरलेली कोथिंबीर, चवीनुसार मीठ घालावे.
तयार मिश्रणाचे छोटे गोळे बनवा आणि हाताने टिक्कीसारखे सपाट करावेत. यामुळे टिक्कीचा आकार तयार होईल.
तव्यावर तेल टाका, तेल गरम झाल्यावर टिक्की शॅलो फ्राय करुन घ्याव्यात.
तयार टिक्कीवर कोथिंबीर टाकावी.
गरमा गरम टिक्की हिरवी चटणी, सॉससोबत सर्व्ह करावी.

# गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर



आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळयांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे

# डोंबिवलीमध्ये पुन्हा मराठी विरुद्ध अमराठी वाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात विशेषतः मुंबई आणि आसपासच्या परिसरात मराठी-अमराठी वाद बराच रंगला आहे. मराठी बोलण्याच्या मुदयावरूनही अनेकदा वाद झाले आहेत. त्यातच आता मुंबईत पुन्हा असाच एक धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आलं आहे. डोंबिवलीमधील 82 वर्षांच्या वृद्ध नागरिकाला हिंदीत बोलण्यास भाग पाडण्यात आलं. मुंबईतील महापेक्स प्रदर्शनात हा संतापजनक प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. एवढंच नव्हे तर 'तुम्ही कुठेही तक्रार करा, आमचं काहीच वाकडं होणार नाही' असं म्हणत महापेक्स प्रदर्शनातील अधिकाऱ्याने त्या ज्येष्ठ नागरिकासोबत अरेरावी केली. या घटनेनंतर 'आपुल्याच घरात हाल सोसते मराठी', असं म्हटलं तर ते काही चुकीचं ठरेल असं वाटत नाही. याप्रकरणी संबिधत ज्येष्ठ अधिकाऱ्याने मुंबई जीपीओच्या फिलाटेलिक ब्युरोकडे तक्रार केली आहे.



## ८२ वर्षांच्या वृद्ध नागरिकाला हिंदीत बोलण्यास भाग पाडण्यात आलं

एकीकडे मराठी भाषा संवर्धनासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मोठा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य करण्यात आले आहे. मराठी बोलणे आणि मराठी व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले. शासकीय कार्यालयात सर्वत्र मराठी फलक असणार आहेत. तसेच मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येणार आहे. मात्र सरकारने हा निर्णय घेतलेला असतानाच देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतच मराठीची ही दुरावस्था होत असून अधिकारी मराठीत बोलण्यास नकार देत ज्येष्ठांचा थेट अमपान करताना दिसत आहेत. त्यामुळे संतापाचे वातावरण आहे.

## मुंबईतील महापेक्स प्रदर्शनात हा संतापजनक प्रकार

**नक्की काय झालं ?**

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीत राहणारे रमेश पारखे हे 82 वर्षांचे गृहस्थ 25 तारखेला मुंबईतील वर्ल्ड ड्रेड सेंटरमध्ये गेले होते. भारत सरकारच्या पोस्ट अँड टेलिग्राफ जीपीओतर्फे आयोजित एका प्रदर्शनासाठी ते पोहोचले. त्यांना काही फिलाटेलीक साहित्य हवं होतं. मला अमुक-अमुक साहित्य हवंय असं सांगत पारखे यांनी मराठीत मागणी केली. मात्र त्या काऊंटरवरील अधिकाऱ्याचा पवित्रा काही वेगळाच होता. तुम्ही जर हिंदीत बोलला नाहीत, तर आम्ही तुमच्याशी बोलणार नाही, तुम्हाला हिंदीत बोलावंच लागेल, असे त्या अधिकाऱ्याने सुनावले. एवढंच नव्हे तर तुम्ही जा, कुठेही जा, तक्रार करा, आमचं काही बिघडणार नाही, अशी उद्धट वागणूक त्या अधिकाऱ्याची होती, असे पारखे यांनी सांगितलं. महाराष्ट्रात राहून अशा तऱ्हेने दादागिरी करणं बरोबर नाही, अशा शब्दांत पारखे यांनी त्यांचा संताप व्यक्त केला.

दरम्यान या संपूर्ण प्रकारानंतर पारखे यांनी संबंधित जी.पी.ओ. पोस्ट खात्यातील अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे. आता या घटनेनंतर त्याविषी राज्य सरकार काय भूमिका घेते याकडे त्यांचं लक्ष लागलं आहे.

मागच्या काही दिवसात मुंबई आणि शेजारच्या ठाण्यात मराठी-हिंदी भाषा वादाच्या घटना घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच कल्याणमध्ये एका मराठी तरुणाला परप्रांतीय रिक्षा चालकांनी मारहाण केल्याच प्रकरण समोर आलं होतं. तर त्यानंतर डोंबिवलीमध्येही मराठी विरुद्ध अमराठी वाद समोर आला. त्यनारायण पूजा आणि हळदी कुंकू समारंभावरुन हा वाद झाला. पूजा आणि हळदी कुंकू समारंभाला सोसायटीतील अमराठी लोकांनी विरोध केला. पूजा आणि हळदी कुंकू समारंभासंदर्भात अपशब्द वापरल्याचाही आरोप झाला होता. दिवसेंदिवस मराठीच्या मुद्दावरून होणारे वाद वाढतच चालले आहेत.

# बेवारस वाहनांवर होणार कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** शहापूर पोलीस ठाणे आवारात असलेल्या गुन्ह्यातील, अपघातातील बेवारस असलेल्या चारचाकी व दुचाकी या वाहनांच्या मालकांनी कागदपत्रे दाखवून घेऊन जावीत असे आवाहन करण्यात आले असून अन्यथा योग्य ती सरकारी नियम नुसार कारवाई करण्यात येणार आहे.

शहापूर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गुन्ह्यातील व अपघातातील बेवारस असलेल्या चारचाकी व दुचाकी अशी एकूण 122 वाहने हे बऱ्याच काळावधी पासून पडून आहेत. सदरची वाहने नादुरुस्त व जुनाट तुटफूट झालेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे या वाहनांवर योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी जाहीर आवाहन पत्राद्वारे दिले आहेत.



या वाहनांच्या मालकांनी वाहनांची कागदपत्रे दाखवून येत्या 8 दिवसांचे आत घेऊन जावीत असे आवाहन करण्यात आले असून अन्यथा या वाहनांवर सरकारी नियम नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

## खा.लंके यांच्या हस्ते
# पारनेर बसस्थानकाचे भूमीपूजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पारनेर** - खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यानंतर मंजुर करण्यात आलेल्या पारनेर येथील बसस्थानकाचे रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता खा. लंके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती पारनेरचे नगराध्यक्ष नितीन अडसूळ व उपनगराध्यक्ष जयदा शेख यांनी दिली.

पारनेर बसस्थानक सन १९८५ मध्ये बांधून पुर्ण झाल्यानंतर ४० वर्षांच्या कालखंडानंतर बसस्थानकाची वास्तू उभी राहणार आहे. बसस्थानकाच्या स्वच्छता गृहाच्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत हे बसस्थानकाची वास्तू उभी राहणार असून हे बांधकाम झाल्यानंतर जुन्या बसस्थानकाचे निर्लेखन करण्यात येणार आहे. त्यानंतर त्या जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभे राहणार आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी पारनेर व सुपा बसस्थानकासाठी नवी इमारत आणि व्यापारी संकुलासाठी पाठपुरावा सुरू केला होता. कोरोना संकटामध्ये २ वर्षे त्यात खंड पडला.

सन २०२० पासून सन २०२४ पर्यंत खा. लंके यांनी या कामासाठी पत्रव्यवहार केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन या कामासाठी २ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजुर होऊन राज्य परिवहन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येऊन दि . १५ मार्च २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. पुढे काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्याने हे काम सुरू होउ शकले नाही. त्यामुळे खा. नीलेश लंके यांनी दि.२१ जानेवारी २०२५ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पत्रव्यवहार करून रखडलेल्या कामाकडे लक्ष वेधले होते. कामाला विलंब झाल्याने २ कोटी ६६ लाख रूपये अंदाजपत्रक असलेल्या कामास मंजुर देण्यात आली.

# तक्षशिला विद्यालयात नर्सिंग प्रयोगशाळा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर नंबर ४ येथील तक्षशिला विद्यालयात नर्सिंग प्रयोगशाळेचे काल पु.भंन्ते.डॉ.एन. आंनद महाथेरो (भारतमहासंघनायक) यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व पालक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उल्हासनगर नंबर ४, सुभाष टेकडी,येथे महामहिम इंटरनॅशनल धम्मदूत सोसायटीचे तक्षशिला विद्यालय माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय असुन यामध्ये विभागातील शेकडो गरीब,गरजु विद्यार्थी शिकत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी नर्सिंग प्रयोगशाळा उभारण्यात आली असुन सदर प्रयोग शाळेचे उद्धाटन काल सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पु.भंन्ते डॉ.एन. आनंद महाथेरो (भारतमहासंघनायक) यांच्या हस्ते करण्यात आले.

ही प्रयोगशाळा उभारण्यासाठी मयुरेश अनिल घाडगे,प्रियंका मयुरेश घाडगे,यांनी मोलाचे आर्थिक सहकार्य केले आहे.या नर्सिंग प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना आरोग्य व नर्सिंग क्षेत्रातील आधुनिक प्रशिक्षणाची संधी मिळणार असल्याची माहिती (प्राचार्य) विद्या भारसाखळे यांनी पत्रकारांशी शी बोलताना दिली. यावेळी संस्थेचे डी.बी.इगळे,राजेश वानखडे, व्हि.टी.वानखेडे, आर.सी.रायबोले, एस.एस. ससाणे, सुबोध गोडाणे,मनोज डोंगरदिवे, दिलीप इगळे, प्रशांत धांडे, विद्या भारसाखळे, अस्मिता भालेराव, भारती देवरे, भारती कीरकीरे,प्रणिता वानखडे, संगिता संसारे यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी,पालक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दही खाण्याच्या योग्य पद्धती

नुसतेच दही खाऊ नका – नुसतेच दही न खाता ते फळे, नट किंवा ओट्स यांसारख्या संपूर्ण धान्यांसह दही एकत्र सेवन करण्याची शिफारस केली गेली आहे. हे मिश्रण ॲसिडिटीचा धोका कमी करते आणि पौष्टिक मूल्य वाढवते.

थंड वातावरणात सेवन टाळा – जर तुम्हाला सर्दी किंवा सायनसची समस्या असेल, तर हिवाळयात सकाळी दही खाणे टाळा. जेव्हा शरीर अधिक सक्रिय असेल, तेव्हा तुम्ही खाऊ शकता.

खोलीच्या तपमानावर- थंडीच्या दिवसांत फ्रिजमधून काढलेले दही खाऊ नका; तर ते खोलीच्या तपमानावर येऊ द्या.

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईल येथे रोजगारांची संधी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इस्त्राईल मधील नॉन वॉर झोनमध्ये घरगुती सहाय्यक (HOME BASED CAREGIVER) या क्षेत्रात युवक युवतींना रोजगाराची संधी आहे याचा जिल्ह्यातील उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार यांनी केले आहे.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या व 25 ते 45 वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान 990 तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे (ऑन जॉब ट्रेनिंग सह). भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवाइफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम जीएनएम / बीएससी नर्सिंग/ पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

इस्त्राईल मध्ये नोकरी मिळवण्यासाठी महाराष्ट्रातच निवड प्रक्रिया व नियुक्तीचे वाटप, आरोग्य तपासणी, व्हिजा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन व मदत विभागाकडून केली जाणार आहे. मेडिकल विमा, राहण्याची आणि जेवणाची सोयही असणार आहे. पात्र उमेदवारांना रु.1 लाख 31 हजार पर्यंत मासिक वेतन दिले जाईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी http://maharashtrainternational.com/job.aspx या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली माहिती भरावी अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग येथे कार्यालयाच्या 02141-222029 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

# स्फूर्ती फाउंडेशनच्या माध्यमातून घरेलु महिला कामगारांची नोंदणी

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाची घरेलु महिला कामगार योजना नोंदणी स्फूर्ती फाउंडेशन माध्यमातून सुरू करण्यात आली आहे. घरकाम करणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ मिळावा व त्यांच्या जिवनात हातभार लागावा या उद्देशाने ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी शंखेश्वर प्रेसिडेन्सी, शॉप नं १६, आर.टि.ओ. जवळ, टावरी पाडा, कल्याण प.येथे राबविण्यात येत आहे.

यासाठी आवश्यक कागदपत्रे सह उपस्थित राहून फॉर्म भरण्यात येणार आहे व पुढील तपासासाठी संबंधित विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. तरी ज्या महिला घरकाम करत आहेत अशा महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी घरेलू महिला कामगार योजने मध्ये आपले नाव नोंदणी करावी असे आवाहन स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर व महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी केली आहे.

## निधी मिळाला – तीन वेळा भूमीपूजनही झाले

# वसईकरांना रुग्णालयाची प्रतीक्षा






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई: तीन वेळा भूमीपुजन होऊन, अडीचशे कोटींचा निधी मंजूर तरी देखील पालिकेच्या आचोळे रुग्णालयाचे काम रखडले आहे. रुग्णालयाच्या जागेचा पुन्हा एकदा तिढा निर्माण झाल्याने रुग्णालयाचे काम आणखीन लांबणीवर पडणार आहे. ही जागा सत्र न्यायालय व न्यायाधीश निवास स्थान बांधण्यासाठी नियोजित करण्यात आल्याचे परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाने काढल्याने रुग्णालयाचे काम थांबले आहे.**

वसई विरार शहरातील नागरिकांसाठी सर्वाधिक खाटांची क्षमता, सुसज्ज अशा सोयीसुविधा असलेले रुग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. त्यानुसार पालिकेने प्रभाग समिती ड मधील आचोळे येथील आरक्षण क्रमांक ४५५ व सर्वे नंबर ६ येथील दोन एकर जागेत २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र विविध प्रकारच्या अडचणीमुळे रुग्णालयाचे काम पुढे सरकले नव्हते. हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुद्धा शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यानंतर

### रुग्णालयाच्या कामाचे तीन वेळा भूमिपूजन

**मागील पाच वर्षांपासून विविध राजकीय पक्ष यांच्या मार्फत केवळ रुग्णालयाच्या भूमीपूजन करण्याचा सपाटा सुरू आहे. १९ ऑगस्ट २०२१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते रुग्णालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. त्याला तीन वर्षे उलटून गेल्यानंतर १० जुलै २०२४ रोजी पुन्हा एकदा भाजपचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्याच दिवशी बहुजन विकास आघाडीचे तत्कालीन आमदार क्षितीज ठाकूर यांनी सुध्दा रुग्णालयाचे भूमिपूजन केले होते.**

८ जुलै २०२४ रोजी शासनाच्या नगरविकास विभागाने महापालिका क्षेत्रातील रुग्णालय व मूलभूत सुविधेसाठी २५० कोटी रुपये निधी मंजूर करून पहिल्या टप्प्यात २५ कोटी रुपये निधीला मंजुरी दिली होती. यानंतर विविध राजकीय पक्षांतर्फे भूमीपूजनही करण्यात आले होते. त्यामुळे रुग्णालयाचे काम मार्गी लागेल असे वाटले होते. त्यातच आता ज्या जागेत रुग्णालय उभारले जाणार आहे ती जागा सत्र न्यायालय व न्यायाधीश निवास स्थान बांधण्यासाठी नियोजित करण्यात आली आहे. वसईतील लँड बेअरिंग क्रमांक ३७६ व सर्व्हे क्रमांक २७ ही सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा ही बदली स्वरूपात न्यायालय उभारणी साठी देण्यात यावी व न्यायालयासाठी नियोजित असलेली जागा सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग करण्यात यावी असे परिपत्रक ही काढण्यात आले आहे.त्यामुळे आता पालिकेने रुग्णालयात उभारणीसाठी आरक्षित केलेल्या जागेचा पेच निर्माण झाला आहे. एकीकडे रुग्णालय उभारणीच्या कामाला निधी मंजूर आहे. परंतु जागा नाही अशीच स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे सुसज्ज रुग्णालयाचे काम आणखीन लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

## वर्षभरात सुरु करणार २५ 'आपला दवाखाना'

### मुंबई महानगरपालिकेचे उद्दिष्ट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबईकरांना मोफत आणि घराजवळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी सुरू केलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्या'ला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे दोन वर्षांमध्ये विविध भागांमध्ये २५० 'आपला दवाखाना' सुरू करण्यात आले आहेत. आता २०२५ मध्ये आणखी २५ 'आपला दवाखाना' आणि तीन फिजिओथेरपी केंद्र सुरू करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. त्यामुळे या वर्षांमध्ये 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्या'ची संख्या २७५ वर पोहचेल आणि अधिकाधिका नागरिकांना याचा लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबईकरांना सहज आरोग्य सेवा मिळावी यासाठी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबईमध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीदिनी १७ नोव्हेंबर २०२२ रोजी पहिला 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात आला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने यामध्ये वाढ करण्यात आली. गेल्या दोन वर्षांमध्ये मुंबई महानगरपालिकेने ३३ पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टीक सेंटरचा समोवश असलेल्या २५० 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात आले. या आपला दवाखान्यामध्ये नागरिकांना मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार, रक्त चाचण्या या सेवा पुरविण्यात येतात. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू केल्यापासून डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे ९० लाख रुग्णांनी या विविध सेवांचा लाभ घेतला. पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कान-नाक-घसा चिकित्सक, दंतचिकित्सक, स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, वैद्यकीय चिकित्सक, त्वचारोगतज्ञ, नेत्ररोगतज्ञ अशा विविध तज्ज्ञांच्या सेवा पुरविण्यात येत आहेत. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' आणि मुंबई महानगरपालिकेच्या इतर दवाखान्यांमध्ये खाजगी डायग्नोस्टिक सेंटरमार्फत एक्स-रे, मॅमोग्राफी, ईसीजी, सिटी स्कॅन, एमआरआय या सेवा व्हॉऊचर पध्दतीने अनुदानित दराने पुरविण्यात येत आहेत. याचबरोबर, आरे कॉलनी आणि गोवंडी, मानखुर्द विभागातील दुर्गम भागांमध्ये फिरत्या दवाखान्यांमार्फत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

नागरिकांच्या सोयीच्या वेळेत आणि घराजवळ दवाखाने उपलब्ध असल्याने मोठ्या संख्येने मुंबईतील नागरिक वैद्यकीय सुविधांचा लाभ घेत आहेत. दिवसेंदिवस वैद्यकीय सुविधांमध्ये पडणारी भर पाहता या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यां'ना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, तो वाढत आहे. ही बाब लक्षात घेता २०२५ मध्ये आणखी २५ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने' आणि तीन फिजिओथेरपी केंद्रे सुरू करण्याचे नियोजन मुंबई महानगरपालिकेने केले आहे. २५ नवे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

---

## नवी मुंबईच्या अर्थसंकल्पात करवाढीला कात्री ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : महापालिका निवडणुकांचे बिगुल नजीकच्या भविष्यात कधीही वाजू शकते, याची पुरेपूर जाण ठेवूनच यंदाचा नवी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. निवडणुकीच्या तोंडावर करवाढीची घोषणा कोणत्याच राजकीय पक्षाला परवडणारी नसल्याने यंदाचा अर्थसंकल्पही कोणतीही करवाढ नसलेलाच असण्याची शक्यता सूत्रांनी वर्तविली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचा कोणतीही करवाढ नसलेला २०२४-२५ चा अर्थसंकल्प तत्कालिन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी गेल्यावर्षी सादर केला होता. गेल्यावर्षी ४९५० कोटी जमा ४९४७.३० कोटी खर्चाचा व २ कोटी ७० लाख शिलकीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प ५ हजार कोटीचा टप्पा पार करणार का याची नवी मुंबईकरांना उत्सुकता आहे. येत्या २० फेब्रुवारीपूर्वी अर्थसंकल्प सादर होईल. राज्याचे वनमंत्री व नवी मुंबई शहरावर सातत्याने राजकीय वर्चस्व असलेले गणेश नाईक यांची 'कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प' ही घोषणा यावेळीही कायम राहण्याची दाट शक्यता आहे. शिवाय गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पाप्रमाणे काही ठाराविक नवे प्रकल्प वगळता गतवर्षीच्या जुन्याच अर्थसंकल्पाला नवी झळाळी मिळणार असल्याचे चित्र आहे.

**मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पाविषयी आढावा बैठका सुरु असून आगामी अर्थसंकल्पात कोणकोणत्या बाबींचा समावेश असले याबाबत आयुक्त स्तरावर विचारविनिमय सुरु असून अर्थसंकल्प ५ हजार कोटींचा टप्पा पार करेल का याबाबत पालिका आयुक्तच अंतिम निर्णय घेतील.**

**– सत्यवान उबाळे,**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**नवी मुंबई महापालिका**

### अतिरिक्त पाणी स्रोतांसाठी भरीव तरतूद

नवी मुंबई महापालिकेच्या या आर्थिक वर्षाच्या अंदाजामध्ये नागरी सुविधा तसेच आरोग्य व शिक्षणासह शहरात आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवण्याच्या दृष्टीने उपायोजना करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत.तसेच शहरात वाढ होणारे पुनर्विकासाचे प्रकल्प, आगामी काळात शहराची वाढणारी लोकसंख्या यांच्यादृष्टीने दीर्घकालिन पाण्याचा स्रोत निर्माण करण्यासाठी भरीव तरतूद केली जाण्याची शक्यता आहे.

हा अर्थसंकल्प नवी मुंबईकरांना भौतिक व नागरी सुविधा, चांगल्या आरोग्य, शिक्षण, परिवहन सुविधा देणारा असेल. मोरबे धरण परिसरात होणारा सोलार प्रकल्प, उर्वरित रस्ते व चौक काँक्रीटीकरण यासारख्या चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण कामे निश्चित करण्यात येतील, अशी चर्चा आहे. गेल्यावर्षी सुरू झालेल्या अनेक जुन्या प्रकल्पांनाच पूर्ण करण्याचे उदिष्ट या अर्थसंकल्पातही पाहायला मिळणार आहे.

सीबीएसई तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाढ अपेक्षित आहे. पायभूत सुविधांवरही अधिक खर्च केला जाणार असून शहरात पार्किंग, तसेच पर्यावरणपूरक वाहनांचा वापर करण्याकडे अधिक भर दिला जाणार आहे.

# सहकार निवडणूक प्राधिकरणाला आयोगाचा दर्जा

### संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत सरकारमध्येच मतभिन्नता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील लाखो सहकारी संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सहकार निवडणूक प्राधिकरणास आता राज्य निवडणूक आयोगाच्या धर्तीवर निवडणूक आयोगाचा दर्जा देण्यात येणार आहे. देशातील अन्य राज्ये तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्राधिकरणाला आयोगाचा दर्जा देण्यात येणार असला तरी या आयोगास संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत मात्र सरकारमध्येच मतभिन्नता आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सरकारने ९७ व्या घटनादुरुस्तीच्या आधारे २०१३ मध्ये राज्यात सहकार निवडणूक प्राधिकरण स्थापन केले. राज्यातील साखर कारखाने, सूत गिरण्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, बाजार समित्या, २५० पेक्षा अधिक सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था अशा एक लाख सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडणे व मतदार याद्या यांचे अधिक्षण, निर्देशन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर सोपविण्यात आली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण ही एक स्वायत्त, स्वतंत्र आणि नि:पक्षपाती प्राधिकरण असून त्यांना स्वायत्तता देण्याबाबत उच्च न्यायालयाने २०१५मध्ये स्पष्ट आदेश दिले असतानाही या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा व संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत सरकारदरबारी गेल्या १० वर्षांपासून चालढकल सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आता या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा देण्याबाबतच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यात येणार असून विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## वसई विरार पालिकेच्या कारवाईला शेकडो रहिवाशांचा विरोध



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : नालासोपारा येथील ४१ अधिकृत इमारतींवर कारवाईच्या विरोधात बुधवारी रहिवाशी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतलल्याने तणाव निर्माण झाला होता. अतिरिक्त पोलीस कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. यामुळे बुधवारी कारवाई करता आली नाही.

वसई विरार महापालिकेतर्फे नालासोपारा येथील ४१ अनधिकृत इमारतींवर कारवाई सुरू आहे. २३ जानेवारी पासून या कारवाईला सुरवात झाली आहे. आतापर्यंत पालिकेने १६ इमारती निष्काषित केल्या आहेत. बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे पालिकेचे पथक कारवाईसाठी गेले. मात्र इमारतींमधील रहिवाशी रस्त्यावर उतरून त्यांनी कारवाईला विरोध केला. आमचे पुनर्वसन करा अन्यथा आम्ही आत्मदहन करू असे सांगत रहिवाशांनी रस्त्यावर ठाण मांडले. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती चिघळून लागल्याने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. वालीव, तुळींज, आचोळा, विरार पोलीस ठाण्याचे अधिकारी फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले आणि रस्ते बंद केले. यानंतर हलक्या पोलीस बळाचा वापर करून रहिवाशांना पांगविण्यात आले. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दंगल नियंत्रण पथक, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तैनात करण्यात आले होते.

आता पर्यंत झालेल्या कारवाईत कुठलाही मोठा विरोध झाला नव्हता. मात्र काही संघटनांनी रहिवाशांना खोटी माहिती देऊन संभ्रम निर्माण केल्याने ते रस्त्यावर विरोध करण्यासाठी उतरले होते. परंतु आम्ही सामोपचाराने त्यांची समजूत काढली, अशी माहिती पालिकेचे अनधिकृत बांधकाम विरोधी पथकाचे प्रमुख उपायुक्त दिपक सावंत यांनी दिली. घराच्या बदल्यात घर दिले जाते असे लोकांना सांगण्यात आले आहे. मात्र अनधिकृत बांधकाम असल्याने तसे करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ही कारवाई होत आहे, असे आम्ही लोकांना सांगितल्याचेही त्यांनी सांगितले. ही प्रक्रिया कायदेशीर आहे हे सांगण्यासाठी पालिकेने पॅनवरील वकिलांना देखील घटनास्थळी आणले होते.

## भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने चला जाणूया नदी अभियान




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : दिनांक 5 : चला जाणूया नदीला या अभियानाद्वारे भिवंडी मनपा व खाजगीशाळेच्या माध्यमातून जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. पालिका आयुक्त श्री अजय वैद्य, अतिरिक्त आयुक्त श्री देविदास पवार साहेब ,मा.अतिरिक्त आयुक्त श्री विठ्ठल डाके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. उपायुक्त( शिक्षण )श्रीम. डॉ. अनुराधा बाबर यांच्या नियोजनानुसार

सदर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या द्वारे नदीचे महत्व ,नदी प्रदूषण ,नदी संवर्धन या संदर्भात घोषवाक्य तयार करून ते विद्यार्थ्यांद्वारे प्रत्यक्ष सादर करण्यात आले .या जनजागृती प्रभात फेरीच्या द्वारे विद्यार्थ्यांद्वारा नदी प्रदूषण ,तलाव प्रदूषण करू नये .नदी व तलाव प्रदूषण झाल्याने आपल्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल याचे महत्त्व देखील महापालिकेच्या विद्यार्थ्यांना द्वारे नागरीकांना पटवून देण्यात आले आहे.

## मुंबई नाशिक महामार्गावर अपघात : ठाणे – भिवंडीत वाहतूक कोंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गावरील डोंगराळी भागात बुधवारी दुपारी ट्रेलर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात मुंबई नाशिक महामार्गावर ठाण्यातील कॅडबरी जंक्शन ते सरावली मार्गापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. या वाहतुक कोंडीमुळे मुंबईहून भिवंडी, कल्याणच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांचे हाल झाले आहेत. सायंकाळी उशीरापर्यंत येथील वाहतुक सुरळीत झाली नव्हती. मुंबई येथून नाशिकच्या दिशेने बुधवारी दुपारी ट्रेलरमधून अल्युमिनिअम धातूचे मोठे तुकडे नेले जात होते. ट्रेलरमध्ये वाहन चालकासोबत त्याचा मदतनीस होता. ट्रेलर डोंगराळी परिसरात आला असता, अचानक वाहनामधील धातूचे तुकडे वाहन चालक बसलेल्या भागात आले. या घटनेमुळे वाहन चालक आणि त्याचा सहकारी वाहनात अडकून राहिले. दुपारी मुंबई नाशिक महामार्गावरून अवजड वाहनांची वाहतुक होते. तसेच कल्याण, भिवंडी आणि नाशिकच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या हलक्या वाहनांची वाहतुकही या मार्गावरून होत असते. अपघातामुळे मार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी झाली होती. मुंबई नाशिक महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने कोंडीत आणखी भर पडली. महामार्गावर दोन्ही दिशेला कॅडबरी जंक्शन ते भिवंडीतील सरावली पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. घटनेची माहिती कोनगाव वाहतुक शाखेच्या कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या पथकाने चालक आणि त्याच्या सहकाऱ्याला ट्रेलरमधून सुखरूप बाहेर काढले. सायंकाळी उशीरापर्यंत महामार्गाची कोंडी सुटली नव्हती. त्यामुळे वाहन चालकांचे हाल झाले.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**शिक्षण विभाग, कल्याण समग्र शिक्षा- शिक्षणाचा अधिकार**

**बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009**

वंचित, दुर्बल, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटकांसाठी
आरक्षित 25% जागांवर मोफत ऑनलाईन शालेय प्रवेश

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 मधोल कलम 12 (1) (सी) नुसार आरटीई 25 टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला/मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतुद आहे.

आरटीई 25 टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी यांची शाळानिहाय यादी घोषित केली जाते. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये असे आवाहन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेमार्फत करण्यात येत आहे. अशा प्रकारचे गैरप्रकार आपल्या निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्रशासन अधिकारी मनपा/नपा, संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे (depmh2@gmail.com), आयुक्त (शिक्षण), पुणे (educommoffice@gmail.com) यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदविण्यात यावी.

तथापि, असा कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर नियमानुसार फौजदार स्वरुपाची कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
(रमेश चव्हाण)
प्रशासन अधिकारी
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

सही/-
(संजय जाधव)
उपआयुक्त (शिक्षण)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

जावक क्रमांक : कडोंमपा/जसंवि/मुका 138
दिनांक : 05/02/2025

# ‘आरटीई’ प्रवेशासाठी पालकांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये- रोहन घुगे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार आरटीई २५ टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला/मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतुद आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये, असे अवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्यामार्फत करण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी यांची शाळानिहाय यादी घोषित केली जाते. गैरप्रकार निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ प्रशासन अधिकारी मनपा/ नपा, संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे (depmh2@gmail.com), आयुक्त (शिक्षण), पुणे (educommoffice@gmail.com) यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदविण्यात यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार फौजदार स्वरुपाची कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी बालकांच्या पालकांनी सहकार्य करावे, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी आवाहन केले आहे.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची बदली रद्द करा

## नागरिकांची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी गुंडागिरीला चांगलाच चाप बसवित पायबंद घातला होता. गुंडागिरी करणार्यांना जेरबंद करीत आपल्या कामाची दशहत गुडांना मध्ये निर्माण केली होती. परंतु अचानक त्यांच्या बदली सत्राने नागरिकामध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कर्तव्य दक्ष कोळसेवाडी पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांची 3 फेब्रुवारी रोजी पोलिस आयुक्त आशुतोष डुबरे कंट्रोल रूममध्ये बदली केली. कदमांच्या बदलीची बातमी ऐकून कल्याणकर नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

मंगळवारी रोजी दुपारी, आरटीआय कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते विनोद तिवारी यांच्यासमवेत कल्याण पूर्वेतील शिष्टमंडळाने पोलीस उपायुक्त कार्यालयात पोहोचत उपायुक्त अतुल झेंडे यांना भेटले आणि कर्तव्यदक्ष अधिकारी कदम यांच्या बदलीबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. सामाजिक कार्यकर्ते विनोद तिवारी म्हणाले की कोळसेवाडीचे पोलिस स्टेशन चे वपोनि अशोक कदम हे त्यांच्या कर्तव्यावर निष्ठावान होते. त्यांनी कल्याण पूर्वेत एक चांगले काम केले. कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे नियंत्रित करीत आणि गुंडागिरीवर आकुंश आणला. अशा निष्ठावान आधिकारयांची बदली होते. ती बदली थांबिवली पाहिजे, यासाठी शिष्टमंडळाने आज पोलीस उपायुक्त यांची भेट घेतली. यावेळी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी तुमच्या सर्व भावना वरिष्ठ अधिकार्यापर्यंत पोचवल्या जातील असे आश्वासन दिले. तर सामाजिक कार्यकर्ते विनोद तिवारी यांचे म्हणणे आहे की, दोन दिवसांत बदली रद्द बाबत न कळल्यास या संदर्भात कल्याणकरांचे शिष्टमंडळ ठाणे पोलिस आयुक्तांना भेटून आणि केलेली बदली रद्द करण्याची मागणी करणार आहोत.

# ‘अ’ प्रभागक्षेत्रातील अनाधिकृत बांधकामावर तोडक कारवाई

## प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे भुमाफिया, चाळ माफियांचे धाबे दणाणले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "अ" प्रभागक्षेत्रातील अनाधिकृत बांधकामाचे पेव फुटले असल्याने दोन दिवसापूर्वी "अ" प्रभाग सहाय्यक आयुक्त पदाचा पदभार स्विकारलेल्या प्रमोद पाटील यांनी अनाधिकृत बांधकामांना चाप बसावा याकरिता धडक अँक्शन प्लान राबवित अनाधिकृत बांधकामवर पाडकाम कारवाईचा बडगा उगारला आहे.

"अ" प्रभाग क्षेत्रातील मोहने, अटाळी, आंबिवली, टिटवाळा, मांडा, गणेश वाडी, बल्याणी उंभर्णी बंदरपाडा परिसरात अनाधिकृत बांधकामचा सुळसुळाट झाला होता. तत्कालीन अ प्रभागाचे सहाय्यक



आयुक्त संदीप रोकडे यांच्या कारकिर्दीत म्हणवी तशी अनाधिकृत बांधकामावर तोडक कारवाई झाली नसल्याच्या चर्चा आणि अनाधिकृत बांधकामांना पायबंद घालू न शकल्यामुळे त्यांची "अ" प्रभाग सहाय्यक आयुक्त पदावरून उचल बागंडी झाल्याच्या खमंग चर्चा पालिका वर्तुळात रंगल्या होत्या.

दोन दिवसापूर्वीच अ प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त पदाचा पदभार स्विकारलेल्या प्रमोद पाटील यांनी कल्याण डोंबिवली आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अनिबांधकाम नियंत्रण विभागाचे उप आयुक्त अवधूत तावडे यांच्या निर्देशानुसार अँक्शन प्लान तयार करून तीन दिवसीय अनाधिकृत बांधकाम पाडकाम मोहीम सुरू केली आहे.

"अ" प्रभागाचे सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी माहिती दिली की, बुधवार 5 फेब्रुवारी ते 7फेब्रुवारी या तीन दिवसीय अनाधिकृत बांधकाम तोडक कारवाई मोहीम सुरू केली असून यामध्ये अनाधिकृत नळजोडणी खंडित करणार असून ही अनाधिकृत बांधकामावर धडक तोडक कारवाई सुरू ठेवणार असल्याचे सांगितले." अनाधिकृत बांधकाम तोडक मोहीमेच्या बडग्यामुळे चाळ माफिया भूमाफियांचे धाबे दणाणले असल्याचे दिसून येत होते. परंतु हा कारवाई चा बडगा किती दिवस की, नुसताच फार्स अशा ही चर्चा यानिमित्ताने रंगल्या होत्या. बल्याणी येथे बुधवारी सकाळी सुरू झालेल्या अनाधिकृत चाळीच्या पाडकाम कारवाईत अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे पोलिस कर्मचारी अनाधिकृत बांधकाम विभाग अ प्रभाग कर्मचारी 1 जेसीबी,1 डंपर असा फौजफाटा होता.

# वालधुनी नदीवरील पुलाचा लोकार्पणापूर्वीच वापर सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर: कॅम्प नंबर तीनमधील उल्हासनगर रेल्वे स्टेशनला ओडणाऱ्या वालधुनी नदीवरील पुलाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. मात्र स्थानिकांनी लोकार्पणापूर्वीच पुलाचा वापर सुरू केला आहे. या पुलाचे लोकार्पण लवकरच करण्यात येईल अशी माहिती पालिकेचे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तरुण सेवकांनी यांनी दिली. शहरातील पश्चिमेकडील उल्हासनगर रेल्वे स्टेशनला जोडणाऱ्या रस्त्यावरील वालधुनी नदीवर नव्याने पूल बांधण्यात आला. मात्र पुलाचे लोकार्पण झाले नसताना नागरिक आणि वाहन चालकांनी पुलाचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे पुलाचे लोकार्पण रखडल्याने गेल्या महिन्यात महाविकास आघाडीच्या



काही पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देत पुलाचे लोकार्पण केल्याचे घोषित केले होते. पुलाचे नामांतर झाल्याचा फलकही पुलावर लावण्यात आला होता. दरम्यान पुलाचा रस्ता, गटार आणि पाण्याची वाहिनी टाकण्यासाठी खोदला होता, त्यामुळे पालिकेच्या कारभारावर टीका झाली होती. पुलाचा रस्ता, गटार आणि पाण्याच्या वाहिनीसाठी खोदल्याने रस्ता दुरस्तीचे आदेश दिल्याचेही सेवकांनी यांनी सांगितले.

# सूचक नाका भागात

## चोरट्यांनी दुकाने फोडली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील सूचकनाका परिसरातील वाहनांची वर्दळ असणाऱ्या पुना लिंक रोड परिसरातील चार दुकाने अज्ञात चोरट्यांनी मंगळवारी रात्री फोडल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. मंगळवारी रात्री साडेतीनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शटर उचकटून लाखोंचा मुद्देमाल लंपास केल्याचा प्रकार सीसीटीव्हीमुळे उजेडात आला आहे.

कल्याण पूर्व सूचक नाका परिसरातील मॉडर्न होम्ससह आजूबाजूच्या दुकानात मंगळवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानांचे शटर उचकटून डल्ला मारल्याची घटना घडली. ज्या चारही दुकानाची अज्ञात चोरट्यांनी शटर उचकटली ती दुकाने मार्बलची होती. मध्यरात्री साडे तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या चार दुकानाचे शटर उचकटून दुकानांमधून रोख रक्कम, लॅपटॉप असा मुद्देमाल चोरी केला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे.

या चोरीच्या घटनेमुळे या परिसरातील दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या प्रकरणी कोळशेवाडी पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात चोरट्या विरोधात दुकानदाराच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस स्टेशन चे पोलीस सीसीटीव्हीच्या आधारे अज्ञात चोरट्यांचा शोध घेत आहेत.

# भिवंडीत इंदुरीकर महाराजांच्या किर्तनाला उत्स्फूर्त गर्दी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा: भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गालगत असणाऱ्या साईधारा लॉजीस्टीक पार्क येथे आयोजीत निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या समाजप्रबोधन किर्तनाला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

साईधारा मुख्य प्रवेशद्वारावर असलेल्या साईबाबा मंदीराचा 9 वा वर्धापन दिन कै. हे. भ. प. रामदास महाराज वाशीरे ह.भ.प.केशव महाराज लाप यांच्या मार्गदर्शनाखाली व साईधारा मेन्टेनन्सचे प्रमुख, उद्योजक पद्माकर पांडुरंग भोईर यांच्या वतीने सोमवारी साजरा करण्यात आला यावेळी श्री साईबाबांची आरती महाअभिषेक, गणेशपुजन व होमहवन, संगीत भजन, प्रवचन, सामुदायिक हरीपाठ असे दिवसभर आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात आले. तर यावेळी रात्री प्रसिद्ध किर्तनकार म्हणून निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर उपस्थीत होते. यावेळी त्यांनी जगातील मुख्य सांप्रदाय म्हणजे वारकरी सांप्रदाय असून माणसाचा खिसा गरम आहे तोपर्यंत ताकत आहे तसेच ४० टक्के मुले मोबाईलवरील रमी खेळुन भिकारी झाले आहेत.तर २० टक्के मुले शेअर मार्केटमध्ये कंगाल झाली आहेत त्यामुळे अनेक वर्षापासून बोलतो आहे की शाळेतील विद्यार्थ्यांचे मोबाईल बंद करा.गावात काही नाही झाले तरी चालेल परंतु शाळा मंदीरे झाली पाहीजेत सध्या१०० तरुणांमधील ९३ तरुण दारू पितात ही शोंकातीका असुन दारूच्या व्यसनामुळे अनेक लहान मुले बापाच्या दहाव्याला दिसत आहेत. पैशापेक्षा काळ मोठा आहे.असे इंदुरीकर यांनी आपल्या समाजप्रबोधन किर्तनात सांगुन उपस्थितांची मने जिंकली यावेळी माजी सरपंच संतोष भोईर, श्रीकांत गायकर, शाम पारधी, भरत पाटील, निलेश देसले साईधारा कार्यालयीन कर्मचारी रुपेश पाटील, भुषण सिंगासने, भावीक ठक्कर उपस्थीत होते.तर यावेळी मंदीरात दर्शनासाठी, किर्तन ऐकण्यासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती.

# ज्ञान विकास संस्थेतर्फे सुनील म्हसकर सर यांचा सन्मान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्थेच्या वतीने थोर समाजसुधारक, विधीतज्ञ व शिक्षण महर्षी ऍडवोकेट पी.सी.पाटील साहेब यांच्या शुभहस्ते शैक्षणिक क्षेत्रातील विशेष योगदान दिल्याबाबत सुनील म्हसकर सर यांचा सन्मान चिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव रमेश वेटा साहेब, जेष्ठ संचालक बळीराम म्हात्रे साहेब, प्रशासकीय अधिकारी रामदास बिडवे सर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शोभा पाटील मॅडम, मुख्याध्यापक दळवी सर, सहशिक्षक व साहित्यिक संतोष जाधव सर, स्कॉलरशिप विभाग प्रमुख प्रदीप म्हात्रे सर व सारिका देशमुख मॅडम, शरद बोडके, शरयू तांबडे आदी शिक्षक बंधू-भगिनी तसेच अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

सुनील म्हसकर सर हे शेतकरी उन्नती मंडळ काल्हेर संचालित सिताराम रामा पाटील विद्यालय व रामदास दूंदा केणे कनिष्ठ महाविद्यालय आमणे येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सुनील म्हसकर सर हे ठाणे जिल्ह्यातील एक उपक्रमशील व हाडाचे शिक्षक असून ते ग्लोबल टीचर्स अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने सन्मानित आहेत. सध्या ते मुंबई विद्यापीठाच्या सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उल्हासनगर या केंद्रातून शिक्षणशास्त्र या विषयात पीएचडी करत आहेत. सुनील म्हसकर यांस आजतागायत त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रातील देदीप्यमान कामगिरीबाबत त्यांस अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ज्ञानविकास संस्था ही नवी मुंबईतील एक नामांकित शैक्षणिक संस्था असून तळागाळातील, झोपडपट्टीतील व शहरी भागातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था वेळोवेळी विविध प्रकारचे उपक्रम, कार्यक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातील शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी, २०२५ मध्ये प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत उज्वल यश संपादन करण्यासाठी सुनील म्हसकर सर यांचे मार्गदर्शनपर व प्रेरणादायी असे व्याख्यान आयोजित केले होते. ज्ञानविकास संस्थेतर्फे सदर सन्मान प्राप्त झाल्याने सुनील म्हसकर सर यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# शंभर टक्के ई केवायसी केल्याने दिनेश धुमाळ यांचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील कोरावळे रास्त भाव दुकान, दुकानदार दिनेश धुमाळ यांनी पुरवठा अधिकारी संयोगिता पवार व पुरवठा निरीक्षक संदीप थोरात यांच्या मार्गदर्शनाने शंभर टक्के ई केवायसी पूर्ण केली आहे. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे विकास गजरे यांनी रास्त भाव दुकानदार दिनेश धुमाळ यांनी शंभर टक्के ई केवायसी केल्याने त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व कौतुकही करण्यात आले.

# डोंबिवली विभाग महापालिकेचा कर्मचारी माघी गणेशोत्सव



डोंबिवली:कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा डोंबिवली विभागाचा सार्वजनिक गणेशोत्सव यंदाची 56 वर्ष असून मोठ्या भक्ती भावाने पाच दिवस साजरा होत आहे डोंबिवली नगरपरिषद असल्यापासून हे कर्मचारी सातत्याने हा उत्सव साजरा करत आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या माघी गणेशोत्सवात सकाळ संध्याकाळ आरती आणि आहे विसर्जनाच्या अगोदर एक दिवशी सत्यनारायणाची महापूजचे आयोजन करीत असतात शेवटचा दिवशी थाटामाटात वाजत गाजत विसर्जन करण्यात येते. या गणेशोत्सवाचे पदाधिकारी दिलीप भंडारी दिलीप चौधरी चारुदत्त परब मिलिंद गायकवाड गणेश कोल्हे आणि इतर कर्मचारी आणि अधिकारी सर्वांच्या प्रामाणिक मेहनतीने हा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडतो हे या मंडळाचे वैशिष्ट्य आहे.

# छत्रपती शिक्षण मंडळाचे अविष्कार विज्ञान प्रदर्शन कल्पकतेकडून कृतीकडे




कल्याण : छत्रपती शिक्षण मंडळ आयोजित अविष्कार कल्पकतेकडून कृतीकडे या आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाची अंतिम फेरी नूतन विद्यालय, कर्णिक रोड,कल्याण येथे नुकतीच संपन्न झाली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विज्ञान भारती, जिल्हादायित्व विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षा महाराष्ट्र संयोजक सुभाष पाटील, छत्रपती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, उपाध्यक्ष ना. के फडके, कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे , चिटणीस गागरे, वेदपाठक संस्था सदस्य मिलिंद कुलकर्णी संस्थेतील विविध शाळांचे मुख्याध्यापक, विज्ञान शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे एकूण 21 शाळांनी सहभाग घेऊन 42 प्रकल्प व 103 विद्यार्थ्यांनी प्रदर्शनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला होता. विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षक म्हणून नरेंद्र गोळे, सुमन नायर, मोमीन सादिया अंजुम जावेद अहमद, गोपा घोष यांनी परीक्षण केले. विद्यार्थ्यांनी प्रयोगाची मांडणी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडली होती. इ. सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांमधून प्रत्येक गटांमध्ये तीन क्रमांक काढण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्पिता कानेटकर यांनी केले. संस्थेच्या एनईपी समन्वयक उर्मिला जाधव तसेच उपप्रमुख जाहिरा तडवी यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली. आभार प्रदर्शन संजय मंजुळे यांनी केले. सुंदर फलक लेखन श्रीहरी पवळे यांच्या संकल्पनेतून साकारले असल्याची माहिती शुभांगी भोसले यांनी दिली.

# युनिफाईट स्पर्धेत पेण तालुका प्रथम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : नुकत्याच पनवेल वाकडी येथे रायगड जिल्हा युनिफाईट असोशिएशनने सेन्ट अँडरुस इंटरनॅशनल स्कूल वाकडी येथे रायगड जिल्हा युनिफाईट फेडरेशन कप चे आयोजन करण्यात आले होते ह्या स्पर्धेत पेण येथील रविंद्र म्हात्रे,आदित्य तेरेदेसाई ,विनायक पाटील प्रथमेश मोकल यांच्याकडे प्रशिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थांनी 21 गोल्ड मेडल,16 सिलव्हर मेडल आणि 3 ब्रांझ मेडल पटकावले ह्या त्यांच्या घवघवीत यशा मुळे पेण तालुका प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला .ह्या स्पर्धेची विजयाची ट्राफी महाराष्ट्र युनिफाईट चे अध्यक्ष मंदार पनवेलकर ह्यांच्या हस्ते देण्यात आली ह्यावेळी आयोजक निलेश भोसले ,रायगड युनिफाईट असोशिएशन च्या सचिव सौ. स्मिता पनवेलकर मॅडम ,तसेच युनायटेड चे प्रसार प्रचार प्रमुख व प्रशिक्षक प्रतिक कारंडे उपस्थित होते.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा युनिफाईट चे रेफरी पॅनल व सहकारी ह्यानि मोलाचे काम पाहीले. ह्या स्पर्धेत पनवेल महापलिका खंदा क्वालनि दुसर्या क्रमांकाचा मानकरी तर पनवेल ग्रामीण हा तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला व उत्कृष्ट टीम म्हणून सूकापुरच्या टीमला सन्माननीय करण्यात आले.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024